दुरध्वनी :- **8850646135**
ई-मेल:- **ps.centralcyber.mum@mahapolice.gov.in**

महाराष्ट्र शासन
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
सायबर पोलीस ठाणे, मध्य विभाग
गुन्हे शाखा,गु.अ. विभाग
वरळी, मुंबई -४०००१८

**!! प्रेसनोट !!** **दिनांक - ०१/०८/२०२६**

**सायबर गुन्हयांसाठी वापरले जाणारे बॅंक खाते ( Mual Account ) खोलणा-या सायबर गुन्हेगारांच्या टोळीस रोख रक्कम व मुददेमालासह अटक केले बाबत**

सायबर पोलीस ठाणे, मध्य विभाग, वरळी, मुंबई यांना दिनांक २९/०७/२०२६ रोजी गुप्त बातमीदारमार्फत माहिती प्राप्त झाली की, इसम नामे सलमान पठाण व त्याचे साथिदार हे **Indian Oversease Bank**, बोरिवली ब्रॅच किंवा माहिम ब्रॅच, मुंबई येथे म्युल बॅंक खात्यात सायबर फसवणुकीचे माध्यमातुन प्राप्त झालेली रक्कम काढण्यासाठी येणार आहे. त्याअनुषंगाने पोलीस ठाणेच्या पथकाने साधारण १५:०० वा सुमारास सलमान पठाण व त्याचे साथिदार हे **Indian Oversease Bank**, बोरिवली ब्रॅच, चंदावरकर रोड, बोरिवली पश्चिम, मुंबई येथे आले असता नमुद बॅंकेतुन १०,००,००० रूपये रोख चेकच्या माध्यमातुन काढल्यावर व आणखी १० लाख रूपये काढण्याच्या प्रयत्नामध्ये असतांना त्याचे दोन साथीदारांसमवेत ताब्यात घेवुन प्राप्त माहीतीनुसार सलमान पठाण याचे स्वत:चे १) के.जी.एन. एन्टरप्रायझेश, भायंदर पश्चिम, ठाणे व २) रिचा एंन्टरप्राझेस- शांती शॉपिंग सेन्टर, मिरारोड, जिल्हा-ठाणे येथे ऑफीसमध्ये पोलीस पथकाने छापा टाकुन तेथुन त्याच्या अजुन ०४ साथीदार यांना चौकशीकामी ताब्यात घेवुन एकुण ०७ आरोपीतांकडे केलेल्या चौकशीवरुन त्यांचा बनावट व्यवहारांसाठी वापरले जाणारे बॅंक खाते (**Mual Account**) खोलणा-या व बॅंकेतुन चेकच्या माध्यमातुन रोख रक्कम काढणा-या सायबर गुन्हेगारांच्या संपर्कात असल्याने नमुद सायबर गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांचेविरूध्द गु.र.क्र. १०६/२०२६ कलम ३१९(२), ३१८(४), ६१(२), ३(५) भा.न्या.सं. ६६ ड माहिती तंत्रज्ञान कायदा २००० प्रमाणे दाखल करून नमुद गुन्हयात त्यांना रितसर अटक करण्यात आली आहे.

**अटक आरोपीतांचे नाव -**

१) श्री सलमान हबीब पठाण वय ३४ वर्षे, २) श्री साजीद निशारअहमद कोठावाला वय ४६ वर्षे, ३) श्री चिराग केतन टोपराणी वय ३१ वर्षे, ४) श्री सय्यद वजाहत वाहीउददीन, वय ४१ वर्षे ५) श्री राकेश रमाशंकर मिश्रा, वय ४२ वर्षे ६) श्री रक्षित के राजेंद्र हेगडे, वय-३५ वर्षे, ७) श्री आर्यन रितेश ठक्कर, वय-१८ वर्षे.

**अटक आरोपीतांच्या अंगझडतीत व ऑफीस झडतीमधे खालील वस्तु ताब्यात घेण्यात आल्या.**

१. एकुण रोख रक्कम १० लाख रूपये,
२. एकुण १६ मोबाईल
३. एकुण ३१ वेगवेगळया कंपन्यांचे स्टॅम्प (शिक्के)
४. वेगवेगळया मोबाईल कंपनीचे २३ सिमकार्ड
५. एकुण २२ वेगवेगळया बॅंक खात्याचे चेकबुक
६. एकुण ०७ नग Indian Oversease Bank चे वेगवेगळया कंपण्यांचे नावाचे बॅंक अकाऊंट किट
७. एक कॅश काउंटींग मशीन

८. बॅंकेत खाते उघडण्यासाठी लागणारे कागदपत्रे, बॅंक स्टेटमेंट, वेगवेगळया एकुण ११ इसमांचे आधारकार्ड, पॅनकार्ड फोटो, सिमकार्डस

९. वेगवेगळया बॅंकाचे खाते क्रमांक असलेले बॅंक स्टेटमेंट व इतर कागदपत्रे

१०. दोन बॅंक अकांउट ओपनिंग टॅब (माहीम व भाईंदर)

नमुद अटक आरोपीतांच्या अंगझडतीमध्ये तसेच कार्यालयांच्या झडतीमधे मिळुन आलेल्या बॅंक खात्यांची नॅशनल सायबर गुन्हे पोर्टलवरून माहीती काढली असता नमुद आरोपीतांकडे मिळालेल्या बॅंक खात्यावर भारतामधे विविध ठिकाणी ८४ पेक्षा जास्त सायबर गुन्हे दाखल असल्याचे आढळुन आले आहेत.

## नागरिकांसाठी सायबर फसवणुकीपासून वाचण्यासाठी नागरीकांना आव्हाहन-

१. तुमचे बॅंक खाते कोणालाही संशयीत व्यवहारासाठी, सायबर गुन्ह्यांसाठी वापरण्यास देऊ नका. तुम्ही त्यात आरोपी होऊ शकता.

२. अनोळखी लिंक व ग्रुप्सपासून सावध राहा:- सोशल मीडियावरील जास्त परताव्याच्या आमिषांना बळी पडू नका आणि अनोळखी व्हॉट्सअॅप किंवा टेलिग्राम ग्रुपमध्ये सामील होऊ नका.

३. सुरक्षा सेटिंग / व्हॉट्सअॅपची प्रायव्हसी सेटिंग "My Contacts Only" ठेवा.

४. गुंतवणुकीसाठी नेहमी SEBI नोंदणीकृत सल्लागारांचीच मदत घ्या आणि पैसे फक्त स्वत:च्या डीमॅट खात्यात ट्रान्सफर करा.

५. वैयक्तिक माहिती व बॅंक खाते शेअर करू नका:- तुमची गोपनीय माहिती, बॅंक खाते किंवा PAN/ PIN/ AADHAR कोणासोबतही शेअर करू नका.

६. अनधिकृत मार्गाने आलेल्या APK फाईल्स (उदा. Mahanagar Gas ) OPEN / INSTALL करू नका.

७. कोणत्याही सायबर फसवणुकीची शंका आल्यास/ तक्रार असल्यास तात्काळ १९३० या हेल्पलाइनवर कॉल करा किंवा cybercrime-gov-in वर तक्रार नोंदवा किंवा लगेच जवळच्या पोलीस ठाण्यास भेट दया.

सदरची उल्लेखणीय कार्यवाही मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती सरांच्या नेतृत्वाखाली, श्री. अनिल कुंभारे-पोलीस सह आयुक्त,गुन्हे, मुंबई, श्री. कृष्णकांत उपाध्याय-अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मुंबई, श्री. बजरंग बनसोडे, पोलीस उप आयुक्त, सायबर गुन्हे शाखा, मुंबई, श्रीमती सुवर्णा शिंदे सहाय्यक पोलीस आयुक्त,सायबर गुन्हे, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलिस ठाणे, मध्य विभाग, वरळी, मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिमाजी आढाव, पोलीस निरीक्षक रविकिरण डोरले, सपोनि अतुल सानप, सपोनि मानसिंग वचकल, सपोनि सविता कावरे, पोहक्र ०३८७६/ अभिजित गोंजारी, पो.ह. ०३३९७/नवनाथ वेताळे, पो. ह.क्र ०४०६९६/विकास तटकरे, पोहक्र ०६०६८३/ किरण पाटील, पोहक्र ०६०६२१/ श्रीकांत पोळ, पोहक्र ०६०७५९/ नंदकिशोर महाजन, म.पोहक्र ०७१२५०/ तनिषा मयेकर, म.पोहक्र ०८०३०८/शितल सावंत, पोशि ०९०३४३/कैलास बाबरे, यांनी केली आहे.